Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४-क/रासेयो/५२/२०२४ दि.१९/०६/२०२४

प्रति,

मा.प्राचार्य/ संचालक/विभाग प्रमुख,
राष्ट्रीय सेवा योजनेचे शासन अनुदानित व स्वंयनिर्वाहि एकक असलेले महाविद्यालये,
मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...

विषय :- २१ जुन आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करणे बाबत...
संदर्भ :- रासेयो-आर डी पुणे यांचे .दि.१८ जून,२०२४ चे ई पत्र..

महोदय / महोदया,

मा.प्रादेशिक संचालक,रासेयो प्रादेशिक संचालनालय,पुणे यांचे संदर्भीय पत्र प्राप्त झाले असून त्यांनी आंतरराष्ट्रीय २१ जुन योगा दिवस २०२४ निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात यावे.प्रत्येक रासेयो एककांनी आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा करणे बाबत जनजागृती करण्यास सुरुवात करावी.राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रत्येक शिबीरात जसे प्रजासत्ताक दिन पथ संचलन,राष्ट्रीय एकात्मता शिबीर,राज्यस्तरीय शिबीरे.विशेष हिवाळी शिबीरांमध्ये योगा पासून दिवसाची सुरुवात होते.तसेच २१ जून आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा केल्याचा अहवाल.फोटो.वृत्त पत्र कात्रणे माय भारत पोर्टल तयार करुन अपलोड करण्यात यावे असे निर्देश दिलेले आहेत.

प्रस्तृत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सोबतच्या शासन निर्देश पत्रान्वये २१ जून आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे आयोजन आपल्या महाविद्यालयातील क्रीडा संचालक, यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात यावे.आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या कार्यक्रमात शिक्षक / शिक्षेकेत्तर कर्मचारी / रासेयो स्वंयसेवक यांना सहभागा विषयी प्रेरीत करावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल,छायाचित्रे,वृत्तपत्र कात्रण यांचे माय भारत पोर्टलवर अपलोडींग करण्याची कार्यवाही करण्यात यावी .अहवाल विद्यापीठाच्या रासेयो कक्षास nss@nmu.ac.in या ई पत्यावर सादर करावा.

कळावे- धन्यवाद !

आपला विश्वासू .

(डॉ. सचिन ज.नांद्रे)
**संचालक,राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबतः-शासन निर्देशपत्र**

**प्रतिलिपी:-** जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक रासेयो.-आपल्या क्षेत्रातील रासेयो एककांचे कार्यक्रम अधिकारी यांना **२१ जुन आंतरराष्ट्रीय योगा दिवस** साजरा करणे व केलेल्या कार्यवहीचा अहवाल.फोटो,बातमी शासनाच्या माय भारत पोर्टलवर अपलोड करण्या विषयी प्रेरीत करावे..

**प्रत :-**१) मा.राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,रासेयो.मंत्रालय कक्ष,मुंबई

२) मा.प्रादेशिक संचालक,राष्ट्रीय सेवा योजना प्रादेशिक संचालानालय,शिवाजीनागर,पुणे -४११ ००५

३) विभाग प्रमख.कलगरु कार्यालय.कबचौउमवि.जळगाव